# संपादकीय...

## धोकेदायक ऊस वाहतुकीला शिस्त लावण्याची गरज

राज्यात सध्या ऊस गाळप हंगाम सुरू असून ग्रामीण भागातील बहुतांश रस्ते ऊस वाहतुकीने गजबजलेले दिसत आहेत. ट्रॅक्टर, ट्रॉली, ट्रक, बैलगाड्या अशा विविध वाहनांमधून ऊस साखर कारखान्यांकडे नेला जात आहे. मात्र या वाहतुकीत सुरक्षिततेचे नियम पायदळी तुडवले जात असल्याने अपघातांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. उसाच्या ट्रॅक्टरला धडकून अपघात अशी बातमी आता अपवादात्मक न राहता जवळजवळ रोजचीच झाली आहे. सुदैवाने यंदाच्या हंगामात मोठी जीवितहानी झाल्याची नोंद कमी आहे; पण मागील काही वर्षांचा अनुभव पाहता ही परिस्थिती अतिशय चिंताजनक आहे. दोन वर्षांपूर्वी दौंड परिसरात झालेल्या अपघातात तीन तरुणांना आपला जीव गमवावा लागला होता. श्रीगोंदा तालुक्यातील काष्टी भागातील हे तरुण दुचाकीवरून जात असताना उसाने भरलेल्या ट्रॅक्टरला धडकले. त्या ट्रॅक्टरला कोणतेही रिफ्लेक्टर किंवा चेतावणी चिन्ह नसल्याने अंधारात ते वाहन दिसले नाही. क्षणभरात घडलेल्या या अपघातात तीन निष्पाप कुटुंबांचे संसार उद्ध्वस्त झाले. अशी उदाहरणे केवळ एक-दोन नाहीत; राज्यभरात अशा अपघातांची यादी मोठी आहे. ऊस वाहतूक ही ग्रामीण अर्थव्यवस्थेचा अविभाज्य भाग आहे, यात शंका नाही. शेतकऱ्यांचे उत्पन्न, साखर कारखान्यांचे उत्पादन आणि लाखो कामगारांचे रोजगार यावर ही वाहतूक अवलंबून आहे. मात्र आर्थिक गरजांच्या आड सुरक्षिततेकडे दुर्लक्ष करणे कितपत योग्य आहे, हा खरा प्रश्न आहे. सध्या बहुतांश ठिकाणी क्षमतेपेक्षा अधिक ऊस वाहतूक केली जाते. ट्रॅक्टरला दोन ट्रॉली जोडून उसाचा डोंगर रस्त्यावरून नेला जातो. समोरून येणाऱ्या वाहनचालकांना फक्त ट्रॅक्टर दिसतो, पण मागे असलेल्या ट्रॉलीवर इंडिकेटर, रिफ्लेक्टर किंवा टेल लॅम्प नसल्याने धोका वाढतो. वाहन अगदी जवळ आल्यानंतरच ट्रॉली लक्षात येते आणि अपघात टाळण्याचा प्रयत्न करताना अनेकदा नियंत्रण सुटते. विशेषतः रात्रीच्या वेळी ही समस्या अधिक तीव्र होते. अंधारात रिफ्लेक्टर, रेडियम पट्टे आणि टेल लॅम्प नसलेली ऊस वाहतूक करणारी वाहने पुढील वाहनचालकांना दिसत नाहीत. मागून येणारी दुचाकी किंवा कार वेगात असताना अचानक समोर उसाची ट्रॉली उभी दिसल्याने धडक होण्याची शक्यता प्रचंड वाढते. काही वेळा ही वाहने रस्त्याच्या मध्यभागीच थांबवली जातात, जे अपघातांना थेट निमंत्रण देणारे ठरते. याहूनही गंभीर बाब म्हणजे अनेक चालकांकडे वाहन चालविण्याचा वैध परवाना नसतो. काही ठिकाणी तर अल्पवयीन मुलेच ट्रॅक्टर चालवत असल्याचे चित्र दिसते. अनुभव, प्रशिक्षण आणि जबाबदारीची जाणीव नसलेले चालक अशा जड वाहनांचे नियंत्रण कसे ठेवणार, हा प्रश्नच आहे. यामुळे केवळ चालकाच्याच नव्हे, तर रस्त्यावरून जाणाऱ्या इतर नागरिकांच्या जीवालाही धोका निर्माण होतो. ऊस वाहतूक करणाऱ्या वाहनांवर मोठ्या आवाजात स्पीकर लावून गाणी वाजवण्याची प्रथा देखील चिंताजनक आहे. मोठ्या आवाजामुळे चालकाचे लक्ष विचलित होते. मागून येणाऱ्या वाहनांचा हॉर्न ऐकू येत नाही, आपत्कालीन परिस्थितीत प्रतिक्रिया देण्यास उशीर होतो. याशिवाय रात्रभर सुरू असलेल्या या आवाजामुळे रस्त्यालगतच्या गावांतील नागरिकांची झोपमोड होते. विद्यार्थ्यांचे अभ्यास, वृद्धांचे आरोग्य आणि सर्वसामान्य नागरिकांचे शांत जीवन यावर याचा विपरीत परिणाम होतो. काही ग्रामीण भागांत अजूनही बैलगाडीने ऊस कारखान्यापर्यंत नेला जातो. अंधारात उसाने भरलेली बैलगाडी समोरून किंवा मागून येणाऱ्या वाहनांना सहज दिसत नाही. रिफ्लेक्टर किंवा दिवे नसल्याने अशा गाड्याही अपघातांचे कारण ठरत आहेत. आधुनिक वाहतुकीच्या युगात या समस्यांकडे दुर्लक्ष करणे परवडणारे नाही. या सगळ्या पार्श्वभूमीवर प्रश्न निर्माण होतो की, ऊस वाहतुकीला शिस्त कोण लावणार? केवळ अपघात झाल्यानंतर हळहळ व्यक्त करून उपयोग नाही. आरटीओ प्रशासनाने पुढाकार घेऊन ऊस वाहतूक करणाऱ्या सर्व वाहनांसाठी स्वतंत्र आणि स्पष्ट नियमावली तयार करणे आवश्यक आहे. प्रत्येक ट्रॅक्टर, ट्रॉली किंवा वाहनाला रिफ्लेक्टर, रेडियम पट्टे आणि टेल लॅम्प बंधनकारक करणे, क्षमतेपेक्षा अधिक भार नेण्यावर कठोर कारवाई करणे, चालकाचा परवाना आणि वयाची तपासणी करणे, ध्वनीप्रदूषणावर निर्बंध घालणे हे उपाय तातडीने राबवले पाहिजेत. साखर कारखान्यांनीही या बाबतीत आपली जबाबदारी स्वीकारली पाहिजे. कारखान्यांच्या गेटवरच नियमांचे पालन न करणाऱ्या वाहनांना प्रवेश नाकारण्याची ठोस भूमिका घेतली, तर बरीच सुधारणा होऊ शकते. स्थानिक पोलीस प्रशासन, ग्रामपंचायत आणि सामाजिक संस्थांनी जनजागृती मोहिमा राबवून चालकांमध्ये सुरक्षिततेबाबत जाणीव निर्माण केली पाहिजे. ऊस वाहतूक ही गरजेची आहे, पण ती सुरक्षित असणे तितकेच आवश्यक आहे. निष्काळजीपणा, नियमभंग आणि बेफिकिरीमुळे जर लोकांचे प्राण जात असतील, तर ही वाहतूक विकासाचे साधन न राहता विनाशाचे कारण ठरते. त्यामुळे धोकेदायक पद्धतीने सुरू असलेल्या ऊस वाहतुकीला तातडीने शिस्त लावणे ही काळाची गरज आहे. प्रशासन, कारखाने, वाहतूकदार आणि नागरिक यांनी मिळून जबाबदारी घेतली, तरच रस्त्यांवरील अपघात कमी होतील आणि अनेक कुटुंबांचे संसार उद्ध्वस्त होण्यापासून वाचतील.

# प्रभू येशू ख्रिस्ताने माणसाला देव माणूस करणार देवराज्य उभारले- अनिल भोसले



युवावार्ता (प्रतिनिधी)

राजुर- प्रभू येशू ख्रिस्ताने धर्म, पंथ, वर्ण, वर्ग, आपला, परका असा कोणत्याच प्रकारचा भेदभाव कधीच केला नाही म्हणून प्रभू येशू ख्रिस्ताने माणसाला देव माणूस करणार देवराज्य उभारलं आहे असे प्रतिपादन ऑल इंडिया ख्रिश्चन फोरमचे उपसंचालक अनिल भोसले यांनी केले. अकोले तालुक्यातील बारी येथील शालोन फाउंडेशन समाज मंदिरामध्ये ख्रिस्त जन्मोत्सवानिमित्त मार्गदर्शन करताना ते बोलत होते.

श्री. भोसले पुढे म्हणाले की, प्रेम, दया, शांतीचा संदेश देणाऱ्या ख्रिस्ताच्या जन्मदिनी राष्ट्रीय एकात्मता जोपण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करायला हवे, तर आज धकाधकीच्या जीवनामध्ये सर्वसामान्य माणूस होरपळून निघत असून हताश झालेल्या गोरगरीब जनतेच्या समस्यावर मात करायची असेल तर आपण एकमेकांना मदतीचा हात द्यायला हवा असल्याचे यावेळी बाळासाहेब घोडके यांनी म्हटले. सर्वत्र सुख शांती प्रस्थापित व्हावी म्हणून यावेळी पास्टर प्रवीण नवाळे यांनी प्रार्थना केली.

या ख्रिस्त जन्म सोहळ्यासाठी स्वच्छता दूत म्हणून परिचित असलेले आदित्य घाटगे, सुनील सोनार, विष्णू खाडे, नंदू शेणे, माधव खाडे, किसन जंगले, नामदेव ढोणे आदींसह मोठ्या संख्येने ख्रिस्ती बांधव उपस्थित होते.

# उत्कृष्ट कामकाजामुळे पतसंस्थेचा राज्यभरात नावलौकिक - सुनील नागरे



युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर - ग्रामपंचायत अधिकारी पतसंस्था ग्राम पंचायत अधिकाऱ्यांची कामधेनु असून संस्थेला ५६ वर्षाची यशस्वी परंपरा आहे. एकच ध्यास सभासदांचा विकास या ध्येय धोरणानुसार सामाजिक उपक्रम म्हणून गेल्या २७ वर्षापासून पतसंस्थेमार्फत आपल्या सभासदांना मोफत दिनदर्शिका वाटप करण्यात येते. यंदाही सन २०२६ या वर्षाची दिनदर्शिका प्रकाशित करण्यात आली असून ती सभासद, नागरिकांना मोफत वितरित करण्यात येत आहे. उत्कृष्ट कामकाजामुळे पतसंस्थेचा राज्यभरात नावलौकिक आहे, असे प्रतिपादन अहिल्यानगर जिल्हा ग्राम पंचायत अधिकारी सहकारी पतसंस्थेचे चेअरमन सुनील नागरे यांनी केले.

अहिल्यानगर जिल्हा ग्राम पंचायत अधिकारी सहकारी पतसंस्थेच्या सन २०२६ या वर्षीच्या दिनदर्शिकेचे प्रकाशन शिर्डी येथे करण्यात आले. यावेळी जिल्हा परिषद कर्मचारी महासंघाचे राष्ट्रीय महासचिव ए.श्रीकुमार, विश्वास काटकर, शशिकांत राय, राज्य अध्यक्ष उमेशचंद्र चिलबुले, संजय म्हांळणकर, अशोक दगडे, प्रशांत जामोदे, ग्रामपंचायत अधिकारी संघटनेचे विभागीय सचिव राजेंद्र पावसे, जिल्हाध्यक्ष युवराज पाटील, जिल्हा सरचिटणीस अशोक नरसाळे, जिल्हा कोषाध्यक्ष सुभाष गर्जे, व्हा. चेअरमन सुनील वाघ, मानद सचिव सविता भाकरे, सुरेश मंडलिक, संचालक सतिश मोटै, दिलीप नागरगोजे, शामराव भोसले, मंगेश पुंड, रूबाब पटेल, किसन भिंगारदे, उध्दव जाधोर, संदीप लगड, वाळू मुंढे, भगवान खेडकर, रामदास गोरे, नारायण खेडकर, अशोक खळेकर, भाऊसाहेब गायकवाड, राणी वाघ, तज्ज्ञ संचालक मधुकर जाधव, एकनाथ ढाकणे, लक्ष्मण नागरे, जालिंदर पाडेकर, बी.एम. गायकवाड, वंदना धनवटे, गणेश मुकणे, आसाराम कपिले, संस्थेचे व्यवस्थापक प्रदीप कल्याणकर, वरिष्ठ सहायक नफीसखान पठाण आदी उपस्थित होते. यावेळी अहिल्यानगर जिल्हा परिषद कर्मचारी महासंघ व ग्रामपंचायत अधिकारी युनियनच्या वतीने १ लाख रुपयाचा धनादेश महासंघाच्या अधिवेशनासाठी देण्यात आला. जिल्हाध्यक्ष युवराज पाटील म्हणाले, परंपरेप्रमाणे यंदाही संस्थेने अतिशय सुंदर दिनदर्शिकेचे प्रकाशन केले असून सभासद तसेच नागरिकांनाही तिचे मोफत वितरण करण्यात येत आहे. भरभक्कम आर्थिक स्थिती असलेल्या संस्थेत सभासद व नागरिकांना मुदत ठेवींवर १० टक्के व्याजदर दिला जातो.

# आनंद मेळावा : विद्यार्थ्यांच्या कौशल्य विकासाचा प्रभावी मंच



युवावार्ता (प्रतिनिधी)

आश्वी - आनंद मेळावा हा केवळ मनोरंजनाचा कार्यक्रम नसून विद्यार्थ्यांच्या कौशल्य विकासाचा प्रभावी मंच आहे. अशा उपक्रमांमधून विद्यार्थ्यांची नेतृत्वगुणे, संवाद कौशल्ये व सर्जनशीलता विकसित होते. बदलत्या काळातील शिक्षण पद्धतींवर भाष्य करत विद्यार्थ्यांनी केवळ अभ्यासापुरते मर्यादित न राहता विविध उपक्रमांमध्ये सक्रीय सहभाग घेणे अत्यावश्यक असल्याचे प्रतिपादन सेवानिवृत्त प्राध्यापक कान्हु गिते यांनी केले.

प्रवरा शिक्षण संस्थेच्या प्रवरा माध्यमिक विद्यालय, पिंपरी लौकी अजमपूर, (ता. संगमनेर) येथे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाच्या उद्देशाने आनंद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. शैक्षणिक गुणवत्तेसोबतच विद्यार्थ्यांमध्ये सर्जनशीलता, सामाजिक जाणीव व आत्मविश्वास निर्माण व्हावा, या हेतूने हा उपक्रम राबविण्यात आला.

आनंद मेळाव्याचे उद्घाटन सेवानिवृत्त प्राध्यापक कान्हु गिते यांच्या हस्ते पार पडले. यावेळी स्थानिक स्कूल कमिटीचे अध्यक्ष भाऊसाहेब मुंढे, मुख्याध्यापक तायगा शिंदे, भाऊसाहेब लावरे, सेवानिवृत्त प्राचार्य अशोकराव गिते, महादेव भिवराज गिते, लक्ष्मण गिते, संतोष गिते आदी मान्यवरांची उपस्थिती होती. मुख्याध्यापक तायगा शिंदे सर यांनी आपल्या मनोगतात शालेय शिक्षण हे केवळ पाठ्यपुस्तकांपुरते मर्यादित न ठेवता विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाशी जोडणे काळाची गरज असल्याचे स्पष्ट केले. आनंद मेळाव्यासारख्या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमधील सुप्त गुणांना वाव मिळतो, संघभावना दृढ होते आणि आत्मविश्वास वृद्धिंगत होतो. अशा उपक्रमांतूनच सक्षम, संस्कारक्षम व जबाबदार नागरिक घडतात, असे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी विविध वस्तू विक्रीसाठी मांडल्या होत्या. यामध्ये शेतीतील ताज्या भाज्या, भाजीपाला, दैनंदिन वापरातील वस्तू, खाद्यपदार्थ यांचा समावेश होता. तसेच विविध उपक्रम व सादरीकरणांद्वारे विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत कार्यक्रमात चैतन्य निर्माण केले. संपूर्ण कार्यक्रम शिस्तबद्ध व उत्साही वातावरणात पार पडला

DR.BHANUDAS DERE FOUNDATION'S
DR.BHANUDAS DERE COLLEGE OF PHYSIOTHERAPY
Nashik-Pune Highway, Karhe ,Sangamner
At-Karhe Post –Nimon Tal- Sangamner Dist- A.Nagar
(Phone No.9960212188 / 7218921878)
E-Mail ID- drbgderephysiotherapycollege@gmail.com
Website-www.drderecollegeofphysiotherapy.com

ADMISSION FOR ACADEMIC YEAR 2025-26

Ref.No:-MED-1025/C.R.NO.58/Allied (Group C)/SVR & Insti.Round/3534 Date:-11/12/2025

Applications are invited from the eligible and interested candidates for admission to 1st year B.P.T for Institutional Level Round/ Institutional Quota (I.Q) for A.Y.2025-26

The eligible & desirous candidates may apply in person /any person to the institute from 25th Dec. to 27th Dec. 2025 up to 5.30pm.

Date:-23/12/2025 President (Dr.Bhanudas Dere Foundation's)

पाहिजेत
अकाऊंटस् व ऑडिटच्या कामासाठी हुशार व होतकरू मुले पाहिजेत
जितेंद्र लाहोटी (चार्टर्ड अकाऊंटंट)
मेनरोड, काळभैरवनाथ मंदिरा शेजारी, संगमनेर
9822523424

पाहिजेत
गोडाऊन राखण करण्यासाठी कुटुंब पाहिजे
हेल्पर - 6
हाउसकीपिंगसाठी महिला -2
संपर्क- प्रतिक क्षत्रिय
8149308990

पाहिजेत
सिव्हील इंजिनियर
Diploma/ B.E. Civil/ Fresher
संपर्क
gulabarch@yahoo.co.in
8459199913

पाहिजेत
हॉटेल दौलत रिफ्रेशमेंट करिता
ज्युनिअर मॅनेजर - १ जागा
अकौंटंट - १ | कॅशियर - ४
स्टोअर असिस्टंट - १
तंदुर कारागिर - १
मोरी साठी कामगार - ४
9665022661
8329104856

पाहिजेत
सेल्समन– ५ जागा
सेल्सगर्ल– ५ | कॅशियर– २
ऑफिस बॉय– १
किमान १२ वी पास/अनुभवास प्राधान्य
संपर्क– सुभाष मनाजी शहाणे ज्वेलर्स, मेन रोड, संगमनेर
9890499699
9118429118

त्वरीत पाहिजे
सह्याद्री ॲग्रोव्हेट कंपनीसाठी
मशीन ऑपरेटर / हेल्पर
नेमणे आहे
वेतन – १४००० ते १६०००
शिक्षणाची अट नाही
पत्ता– प्लॉट नं. – ४२, औद्योगिक वसाहत, पाण्याच्या टाकी जवळ
8484046463
9527426464

पाहिजेत
संगमनेर मधील नामांकित ज्वेलरी शॉप मध्ये जागा भरणे आहे
सेल्स एक्झिक्युटिव्ह - 2
मार्केटिंग प्रतिनिधी
ऑपरेटर - 2 ड्रायव्हर
आकर्षक पगार दिला जाईल
एम जी काजळे अँड सन्स, संगमनेर
9850545333

पाहिजेत
वेल्डिंग कामासाठी कामगार पाहिजेत
वेल्डर -१
हेल्पर - १
संपर्क
७९७२९६३३९७

पाहिजेत
डॉक्टर्स ०२- महिला (बी.ए.एम.एस/एम.डी.)
पंचकर्म थेरपिस्ट - ४ (स्त्री/पुरुष) ट्रेनिंग दिले जाईल
रिसेप्शनिस्ट - २ (महिला) कॉम्प्युटर ज्ञान आवश्यक
ओ. टी. ॲसिस्टंट - १ (पुरुष)
माधवबाग क्लिनिक
९३२५०२८६८६

जनरेटर विक्री
नविन सुस्थितीत असलेले
जनरेटर
७.५ KV
विकणे आहे
8378956909
02425-221380

पाहिजेत
नामांकित फ्लेक्स दुकानात कामासाठी मुले पाहिजे
हुशार व होतकरू
आकर्षक पगार
संगमनेर
9850969366

पाहिजेत
श्रद्धा क्लिनिक आणि पंचकर्म सेंटर
ताजणे मळा, प्रभात मेडिकल समोर
रिसेप्शनीस्ट
पार्ट टाईम/ फुल टाईम जागा
8080548282

पाहिजेत
पेपर डिलिंग कंपनी करिता खालील जागा भरणे आहे
सेल्स एक्झीक्युटिव -१ एमबीए असल्यास प्राधान्य
ऑफिस असिस्टंट -१ कॉम्पुटरचे ज्ञान आवश्यक
कार ड्रायव्हर - १ अनुभव असल्यास प्राधान्य
घरकाम करणारी महिला-१ सर्व घरकाम
सिद्धार्थ एंटरप्राईजेस, संगमनेर, कॅनरा बँकेजवळ, नवीन नगर रोड,
अर्जासह समक्ष भेटावे
संपर्क - 9822399371/ 7879708888

युवा ध्येय वृत्तपत्र कार्यालयासाठी अर्जंट
पाहिजेत
• उपसंपादक • जाहिरात प्रतिनिधी • वितरण प्रतिनिधी
• टेलिकॉलर
आकर्षक पगार + ट्रॅव्हलिंग + इन्सेंटिव्ह
(अनुभवी व्यक्तींना प्राधान्य)
कार्यालय– विठ्ठल स्मृती कॉम्पलेक्स, मनोज ऑटो शेजारी, अकोले रोड, संगमनेर, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर
फोन (०२४२५)२६१८७२, ७७६८०७९२७२






College of Physiotherapy
ESTD 2008
Dr.Bhanudas Dere Foundation
विद्वान सर्वत्र पुज्यते

DR.BHANUDAS DERE FOUNDATION'S
DR.B.G DERE
PHYSIOTHERAPY COLLEGE
NASHIK-PUNE HIGHWAY,AT-KARHE,POST- NIMONE, TAL-SAMGAMNER

COLLEGE CODE - 06197
EMAIL ID-
drbgderephysiotherapycollege@gmail.com
Contact-9022103203

**B.P.T 2025-26 Institutional Level Round 1**
**Date-27/12/2025 Time -6:30PM**

# Vacancy Position

| Category | Vacancy |
|---|---|
| SC | 00 |
| ST | 00 |
| VJ A | 00 |
| NT B | 00 |
| NT C | 00 |
| NT D | 00 |
| OBC | 00 |
| SEBC | 00 |
| EWS | 00 |
| OPEN | 00 |

Dr. B. G. Dere Physiotherapy College 06197 Sangamner

27/12/2025

Principal
Dr. B. G. Dere Physiotherapy College
Karhe, Sangamner, Dist -Ahmednagar

College of Physiotherapy
Dr.Bhanudas Dere Foundation
विद्वान सर्वत्र पुज्यते

DR.BHANUDAS DERE FOUNDATION'S

DR.B.G DERE
PHYSIOTHERAPY COLLEGE

NASHIK-PUNE HIGHWAY,AT-KARHE,POST- NIMONE, TAL-SAMGAMNER

COLLEGE CODE - 06197

EMAIL ID-
drbgderephysiotherapycollege@gmail.com

Contact-9022103203

Date-27/12/2025

Time:-6.30pm

**DR .B. G. Dere Physiotherapy College, Sangamner**

B.P.Th 2025-26 institutional level Round:-01

**SELECTION LIST OF STUDENTS - NA**

## As per Sear-Matrix of CET CELL Dated :- 24-12-2025 vacant seat position is 00

Dr. B. G. Dere Physiotherapy College 06197 Sangamner

27/12/2025

**Principal**
Dr. B. G. Dere Physiotherapy College
Karhe, Sangamner, Dist -Ahmednagar

DR.BHANUDAS DERE FOUNDATION'S

**DR.B.G DERE PHYSIOTHERAPY COLLEGE**

NASHIK-PUNE HIGHWAY,AT-KARHE,POST- NIMONE, TAL-SAMGAMNER

COLLEGE CODE - 06197

EMAIL ID- drbgderephysiotherapycollege@gmail.com

Contact-9022103203

Date-27/12/2025

# DR .B. G. Dere Physiotherapy College, Sangamner

B.P.T 2025-26 Institutional Level Round-01

List of Applicants

| Sr No. | All India Rank | CET Cell Form No. | NEET Roll No. | Name of Candidate | Gender | Category | Marks(NEET 2025) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. | 1500687 | 256064535 | 3113106108 | SHAIKH ZEENAT YUSUF | Female | OBC | 91 |
| 2. | 1587556 | 256068984 | 3113111123 | NICHIT ATHARVA MANOHAR | Male | OBC | 82 |
| 3. | 1803106 | 256001882 | 3113110432 | SARDA UNNATI | Female | OPEN | 60 |
| 4. | 1908742 | 256015649 | 3118216531 | DHAMALE VEDANT SOMNATH | Male | OBC | 50 |

Dr. B. G. Dere Physiotherapy College 06197 Sangamner

27/12/2025

Principal

Dr. B. G. Dere Physiotherapy College

Karhe, Sangamner, Dist -Ahmednagar